ePaper

## सत्ता संघर्ष आणि शिवसेना फुटीप्रकरणी आज सुनावणी



| वर्ष - 6 | अंक - 299 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- भारत जोडणाऱ्या राहुल गांधींबरोबर देश तोडणाऱ्या मोदींची...”
- या निष्ठावंतांचं करायचं काय?
- महाराष्ट्र हे भारताचं विकास इंजिन

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 14 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मत विभाजनाची धास्ती!

## » महाविकास आघाडीची जुळवाजुळव : विरोधी पक्षनेते अजित पवार यांची ‘फिल्डिंग’

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**महाविकास आघाडीत एकजूट असेल, तर ाजपासारख्या बलाढ्य पक्षाला सहज पराभूत करु शकतो, असा आत्मविश्वास महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आहे. मात्र, चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत हीच ‘वज्रमूठ सैल’ होणार की काय? आणि मतांचे संभाव्य विभाजन रोखण्यासाठी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांची कसरत सुरू झाली आहे.**



महाविकासआघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारार्थ वाल्हेकरवाडी येथील कार्यालयात महाविकास आघाडीचा कार्यकर्ता मेळावा झाला. यावेळी प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले, राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते. या मेळाव्यात महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भाषणाचा कल पाहता. केवळ शिवसेनेला मानणारी मते अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्याकडे जावू नयेत. त्यासाठी कार्यकर्ते आणि मतदारांचे ‘ब्रेन वॉश’ करण्याच्या प्रेरणेतून भाषण प्रपंच करण्यात आल्याचे पहायला मिळाले.

अजित पवार यांनी थेट अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना लक्ष्य केले. “बेडुक कितीही फुगला तरी बैल होत नाही” असा टोला लगावला. तसेच, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी, शिवसेना आणि वंचित आघाडीच्या पाठींब्यामुळे कलाटे यांना सव्वा लाख मते मिळाली आहेत. त्यामुळे त्यांनी स्वत:ला नेता समजू नये, असा अप्रत्यक्ष इशारा दिला. प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनीही महाविकास आघाडीची वज्रमूठ कशी असावी, याचेच विश्लेषण केले.

त्यामध्ये हात, हातातील घड्याळ, धनुष्यबाण आणि हातात घेतलेली मशाल... असा संदर्भ देत महाविकासा आघाडीतील मतदान कशाप्रकारे एकजूट राहील, याचेच आवाहन केले. आदित्य ठाकरे यांनी थेट शिंदे गटाला लक्ष्य केले. गद्दार, खोके सरकार आणि घटनाबाह्य मुख्यमंत्री... अशा शब्दांचा मारा करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची “बाळासाहेबांची शिवसेना” कशी कमकूवत आहे, याचाच पाढा वाचला.

महाविकास आघाडीची ताकद विशद करताना, अजित पवार यांनी नुकत्याच झालेल्या पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकांचा दाखला दिला. या निवडणुकांमध्ये पाचपैकी चार जागांवर महाविकास आघाडी विजयी झाली आहे. त्यामुळे मत विभाजन टाळल्यास भाजपाला रोखणे शक्य आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच, राहुल कलाटे यांना किती मते पडतात? हे कळेच... असे आव्हानही स्वीकारले आहे.

### अजितदादांनी प्रोटोकॉल बदलला...

» विशेष म्हणजे, सभा शिष्टाचाराप्रमाणे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे भाषण सर्वात शेवटी होईल, असे वाटत होते. मात्र, आदित्य ठाकरे यांना आपल्यानंतर बोलण्याची सूचना अजित पवार यांनी स्वत: केली. आपल्या भाषणात शिवसेना स्थापन करण्यात शिंदे गटाचे योगदान काय? असा सवाल उपस्थित केला. बाळासाहेब ठाकरे यांनी शेवटच्या दिवसांत उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांना सांभाळा...असे आवाहन केले होते. पक्षाची आणि युवा सेनेची सूत्रे बाळासाहेबांनीच त्यांच्याकडे दिली होती, याचा उहापोह केला. तसेच, महापालिका निवडणुकीत तिकीट वाटपाबाबत सर्वांना सोबत घेवून निर्णय घेण्यात येईल. कोणी रुसू नका, फुगू नका... असे आवाहन पवार यांनी केले. अजित पवार यांचा एकूणच बोलण्याचा कल शिवसेनेला मानणारी मते फुटली नाही पाहिजे, असाच होता. दुसरीकडे, खासदार श्रीरंग बारणे यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे चिंचवड मतदार संघातील शिवसेनेचा मोठा गट भाजपाच्या पाठिशी राहील, अशी अप्रत्यक्ष धास्ती राष्ट्रवादीच्या मनात निर्माण झाली आहे, असा ग्राउंड रिपोर्ट आहे.

# बेडूक कितीही फुगला म्हणून बैल होत नसतो!

## » अजित पवार यांची टीका : चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या परवानगीने महाविकास आघाडीची उमेदवारी नाना काटे यांना जाहीर केली आहे. ही निवडणूक भाजपाविरोधात थेट लढत व्हावी, असे आमचे प्रयत्न होते. मात्र, पक्षश्रेष्ठींची विनंती धुडकावत राहुल कलाटे यांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतला नाही. “मला सव्वा लाख मते आहेत..” असा दावा करणाऱ्या अपक्ष उमेदवाराला आता महाविकास आघाडीची ताकद दाखवण्याची वेळ आली आहे. “बेडूक कितीही फुगला तरी बैल होत नसतो..” अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली.**



महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारानिमित्त वाल्हेकरवाडी येथे कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. त्यावेळी पवार बोलत होते. यावेळी शिवसेना युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. अजित पवार म्हणाले की, पोटनिवडणुकीसाठी काहीजण उमेदवारी मागत होते. शेवटच्या दिवशी उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांच्याशी चर्चा केली. सकाळी साडेनऊ पर्यंत बोलणे चालू होते. ठाकरेंची परवानगी घेऊन नाना काटे यांचं नाव फायनल केलं. त्यानंतर जयंत पाटलांनी ट्वीट करीत उमेदवारी जाहीर केली. अपक्ष उमेदवाराचा फॉर्म राहु नये म्हणून आम्ही सगळे प्रयत्न करत होतो. स्ट्रेट फाईट होऊ द्या, जशी कसब्यात होत आहे.

### मराठवाड्यातील निवडणुकीचा दिला दाखला...

» “ मराठवाड्यात शिक्षक संघाची निवडणूक होती. ती जागा राष्ट्रवादीला मिळाली. आम्ही साहेबांनी ठरवून उमेदवार फायनल केला. मात्र, राष्ट्रवादीच्या पठ्ठ्याने बंड केलं. त्याला समजवून सांगण्याचं काम केलं. शेवटी लोकांनी सांगितलं ‘दादा त्याला पाचेशच मतं पडतील’. तो तर आपला वक्ता होता, अशी माझी समज होती. परंतु, निवडणुकीत त्याला फक्त चारशेवर मतं पडली. कधी आम्हालाही वाटतं आम्ही लयं मोठ झालो. आपल्याला वाटतं आपल्यामागे जनता आहे. परंतु, त्या उमेदवाराच्या मागे पक्ष ,संघटना, नेते आणि त्याचे वलयदेखील असते. म्हणून ते तिथे निवडून येत असतात. परंतु काहीजन हे विसरून जातात.” असा दाखलाही अजित पवार यांनी दिला.

# चिंचवडमध्ये परिवर्तनाचे वारे!

## » आदित्य ठाकरे : नाना काटे यांचा विजय निश्चित

। पिंपरी । महाईन्यूज ।



गद्दारांना हाताशी धरून भाजपाने राज्यात घटनाबाह्य सरकार आणले आहे. या सरकारच्या विरोधात जनतेमध्ये मोठा आक्रोश असून नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेमध्ये शिक्षक आणि पदवीधरांनी महाविकास आघाडीला कौल दिला आहे. चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीतही बदलाचे वारे वाहत असून या ठिकाणी 'कांटे की टक्कर नसून काटे से टक्कर है', त्यामुळे चिंचवडमध्येही जनताच परिवर्तन घडवून आणेल आणि नाना काटे यांना विजयी करेल, असा ठाम विश्वास युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विठ्ठल ऊर्फ नाना काटे यांच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीचा सोमवारी (दि. 13) वाल्हेकरवाडीत संयुक्त मेळावा पार पडला. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ठाकरे बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख सचिन अहिर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (गवई गट) डॉ. राजेंद्र गवई, आमदार सुनील शेळके, अण्णा बनसोडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आदी उपस्थित होते. आदित्य ठाकरे म्हणाले की, पाठीत चाळीस वार करून सध्या राज्यात गद्दारांचे खोके सरकार अस्तित्वात आले आहे. हे सरकार घटनाबाह्य आणि अल्पआयु ठरणार आहे. येत्या काही दिवसांत हे सरकार निश्चितच कोसळेल याचा मला ठाम विश्वास आहे. या सरकारबद्दल राज्यातील जनतेत प्रचंड रोष, चिड आणि आक्रोश आहे.

आम्ही सत्तेत असताना करोना काळात देखील शेतकऱ्यांना १४ हजार कोटींची मदत केली होती. मात्र या सरकारच्या काळात राज्याची प्रगती थांबली असून शेतकरी आत्महत्या करत आहे. सध्याचे राजकारण अत्यंत घाणेरडे झाले असून त्यात बदल करावा लागणार आहे. त्यासाठी आपण महाविकास आघाडीच्या पाठीशी ठामपणे उभे रहा, असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केले.

### महाविकास आघाडीला विजयी करा...

**» राज्याच्या विकासासाठी महाविकास आघाडीकाँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेची विचारधारा वेगळी असली तरी महाराष्ट्राचे हित डोळ्यासमोर ठेऊन महाविकास आघाडीची निर्मिती करण्यात आली आहे. संविधानाचा खून करणारे सरकारमध्ये बसले आहेत. सध्याची लढाई ही महाशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी सुरू आहे. सरकारमध्ये बसलेल्यांची निवडणुकांना सामोरे जाण्याची हिंमत नाही. ते पाठीत खंजीर खूपसून सत्तेत बसले आहेत. आपला लढा मोठा आहे. गद्दार आणि त्यांना पाठींबा देणारे भाजप या दोघांना धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ असून चिंचवड पोटनिवडणुकीत नाना काटे यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करा, असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केली.**

---

## उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार करणाऱ्यांचा बदला घ्या

### अजित पवार यांचे मतदारांना आवाहन

।पुणे । महाईन्यूज ।



चिंचवड आणि कसबा पोट निवडणुकीचा प्रचारानं सध्या चांगलाच वेग घेतला आहे. गेल्या दोन दिवसांपासून या दोन्ही मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी आणि भाजपकडून जोरदार सभा घेतल्या जात आहेत.

दरम्यान, चिंचवडमधील एका सभेत विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी शिवसैनिकांना एक मोठं आवाहनं केलं. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार कारणाऱ्यांचा बदला घ्या, असं आवाहन त्यांनी केलं आहे. अजित पवार म्हणाले, "आपल्याला उद्याची कसबा आणि चिंचवडची पोटनिवडणूक का महत्वाची आहे. ज्या प्रकारे उद्धव ठाकरेंना महाविकास आघाडी सरकारचं मुख्यमंत्रीपद सोडावं लागलं आणि पायउतार व्हावं लागलं, त्याचा बदला शिवसैनिकांनो उद्या निवडणुकीमध्ये घ्यायचा आहे. आता इजा-बिजा झाली आता यांना तिजा दाखवायची आहे, त्याशिवाय गप्प बसायचं नाही. मित्रांनो काय चुकलं, शिवसेना काढली कुणी हे तुम्हाला माहितीच आहे. जे गेले त्यांचा शिवसेना काढण्यात खारीचा किंवा नखाचा तरी वाटा आहे का? काही संबंध आहे का? शिवसेनाप्रमुखांनी तिकीट दिलं म्हणून निवडून आणलं यांना, असंही यावेळी पवार म्हणाले. बाळासाहेबांनी शिवाजी पार्कमध्ये सांगितलं होतं की, आता माझं वय झालेलं आहे. यापुढं शिवसेना प्रमुखाची जबाबदारी उद्धव ठाकरे सांभाळतील. तसेच युवा नेतृत्व म्हणून आदित्य ठाकरे काम करतील. मग जर बाळासाहेबांनी हे सांगितलं असताना हे सटर फटरवाले काय मधीच करायला लागलेत. उद्या निवडणुका लागू द्या यांची काय अवस्था होतेय ते बघाच, अशा शब्दांत त्यांनी शिंदे गटावर सडकून टीका केली.

## सोसायटीधारक राहुल कलाटेंच्या पाठिशी!

### चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचा कलाटे यांना पाठींबा

। पिंपरी । महाईन्यूज ।

प्रतिनिधी।



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना प्रचाराच्या सुरुवातीलाच मतदारांचा पाठिंबा वाढत आहे. वाकड पुनावळे परिसरातील ३६० हून अधिक गृहनिर्माण सोसायटीधारकांनी एकमताने उच्चशिक्षित उमेदवार असलेले कलाटे यांना पाठिंबा दिला. चिंचवडच्या विकासासाठी पुढचे आमदार राहुल कलाटे असा निर्धार सोसायटीधारकांनी केला आहे. चिंचवडच्या राजकारणात निर्णायक ठरणारी सोसायटीधारकांची मते कलाटे यांच्या पाठिशी ठामपणे उभी राहणार आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष राकेश शडगे यांनी राजीनामा दिला आहे. कलाटे यांना पाठिंबा दिला. वाकडगावचे ग्रामदैवत म्हातोबाला श्रीफळ वाढवून राहुल कलाटे यांनी रविवारी प्रचाराचा शुभारंभ केला. प्रचार सुरु करताच नागरिकांचा पाठिंबा वाढू लागला असून चिंचवडमध्ये सर्वत्र शिट्टीचा गजर सुरु झाला आहे. मतदारसंघात सर्वत्र शिट्टी वाजताना दिसते. लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसतो. कलाटे यांच्या उमेदवारीमुळे मतदारांमध्ये उत्साह आला आहे. कलाटे यांच्याबाबत मतदारांमध्ये सहानुभूती दिसते. चिंचवड विधानसभा मतदारसंघात गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये 50 हजारहून अधिक मतदार आहेत. सोसायटीतील नागरिक विकासाचे व्हिजन ठेवून काम करणा-या उमेदवारांच्या पाठिमागे ठामपणे उभे राहतात. राहुल कलाटे यांनी नगरसेवक, गटनेता असताना वाकड परिसराचा कायापालट केला. सोसायटीधारक हक्काचा व्यक्ती म्हणून कलाटे यांच्याकडे पाहतात. सोसायटीचे कोणतेही काम असल्यास कलाटे मदतीला धावून येतात. त्यामुळेच पोटनिवडणुकीत सोसायटीधारकांनी कलाटे यांना पाठिंबा दिला आहे.

### राष्ट्रवादी माथाडी कामगार युनियनच्या

**»दरम्यान, राष्ट्रवादीचे माथाडी कामगार युनियनचे शहराध्यक्ष साकी गायकवाड यांनी राहुल कलाटे यांना पाठिंबा दिला आहे. महाविकास आघाडीकडून कलाटे यांना उमेदवारी मिळेल असे समजून आम्ही काम सुरु केले होते. तरुणवर्गाची तशी भावना होती. परंतु, तसे घडले नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवर शिव-फुले-शाहु-आंबेडकरी चळवळीतील तरुणांनी राहुल कलाटे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही सर्वजण त्यांचे काम करणार आहोत. कलाटे यांचा प्रचार करण्यासाठी कोणताही अडथळा येवू नये यासाठी राष्ट्रवादीच्या पदाचा गायकवाड यांनी राजीनामा दिला आहे.**

# अबला नहीं सबला है तू!

## » चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : अश्विनी जगताप यांना महिलांचा वाढता पाठींबा

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भारतीय महिला 'अबला नहीं सबला है' असा प्रत्यय पिंपरी-चिंचवडमधील राजकीय पटलावर पहायला मिळत आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप पतीच्या निधनानंतर अवघ्या महिनाभरात लागलेले निवडणुकीला मोठ्या धीराने सामोरे जात असल्याचे पाहून महिला वर्गाचा प्रचंड पाठिंबा त्यांना मिळताना दिसत आहे.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी सोमवारी काळेवाडी परिसरात मतदारांशी संवाद साधला. काळेवाडीच्या विविध भागात कोपरा सभा घेतल्या. त्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांनी अश्विनी जगताप यांचा एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजय करण्याचा निर्धार व्यक्त केला.

सोमवारी अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी काळेवाडी भागात नागरिकांशी संवाद साधला. विविध भागात कोपरा सभा घेऊन निवडणुकीत विजयी करण्याचे महिला मतदारांना भावनिक आवाहन केले. महिलांनीही अश्विनीताई तुम्हाला आम्ही एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करू, असे अभिवचन दिले.

यावेळी माजी उपमहापौर नानी घुले, माजी नगरसेविका नीता पाडाळे, माजी नगरसेवक प्रमोद ताम्हणकर, पुणे नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, माजी स्वीकृत सदस्य विनोद तापकीर, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ तापकीर, कैलास सानप यांच्यासह भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नहीं अबला मैं योद्धा मर्दानी हूं...!

» भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप या नागरिकांशी घरोघरी जाऊन संपर्क साधत आहेत. विशेषतः त्या जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे मतदारसंघात अश्विनी जगताप आणि महिला मतदारांमध्ये जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आहे. अश्विनी जगताप पतीच्या निधनाचे दुःख बाजूला ठेवून करत असलेल्या प्रचारामुळे महिला मतदारांमध्ये त्यांच्याविषयी प्रचंड सहानुभूती निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्या जेथे जातील तेथे त्यांना महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अश्विनी जगताप यांच्या प्रचारातील आघाडी पहाता "मैं इतिहास विजय कहानी हूं, नहीं अबला मैं योद्धा मर्दानी हूं।" अशी प्रचिती येत आहे.

---

# काँटे की नव्हे, काटेंशी टक्कर!

## » युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे : महाविकास आघाडीपुढे गद्दार टिकणार नाहीत

।पिंपरी चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**चिंचवड मतदार संघातील निवडणूक काँटे की टक्कर नव्हे, काटेंशी टक्कर आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जोरावर विठ्ठल उर्फ नाना काटे निवडून येणार आहेत. महाविकास आघाडीच्या एकजुटीपुढे गद्दार टिकणार नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी केली.**



चिंचवड पोटनिवडणुकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारार्थ आघाडीचा मेळावा झाला. यावेळी राज्याचे विरोधीपक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे नाना पटोले आणि महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. यावेळी या तीनही नेत्यांनी भाजप आणि राज्यातील फडणवीस-शिंदे सरकारवर टीकेची झोड उठवली.

आदित्य ठाकरे म्हणाले की, ही पोटनिवडणूक म्हणजे काट्याची नाही,तर काटेंशी टक्कर आहे. तसेच राज्यातील गलिच्छ राजकारणाविरुद्धचा तो लढा आहे. राज्यातील मुख्यमंत्री महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत की गुजरातचे असा प्रश्न उपस्थित करतानाच या गद्दार सरकारला महाराष्ट्राला पुढे न्यायचेच नाही. या घटनाबाह्य गद्दार गँगवर उद्योजकांचा विश्वास न राहिल्याने ते बाहेर जात आहेत. हे उद्योग गुजरात व देशात इतरत्र गेल्याचे दुख नाही, तर राजकीय हेतूसाठी ते तिकडे पाठविले गेल्याचे दुख आहे असा हल्लाबोलही आदित्य ठाकरेंनी यावेळी केला.

### गद्दारांच्या सभेला खूर्चींची गर्दी...

» राजीनामे देऊन माझ्या वरळी, मुंबई येथील मतदारसंघातून आपल्याविरुद्ध लढण्याचे आव्हान मुख्यमंत्र्यांनी न स्वीकारल्याने आता त्यांनी त्यांच्या ठाण्यातील मतदारसंघातून आपल्याविरुद्ध निवडणूक लढवावी असे आव्हानही आदित्य यांनी यावेळी दिले. यावेळी आम्ही खोक्याला हात लावला नाही, पण चाळीस आमदार आणि १३ खासदारांनी तो लावला नसल्याचे अजून सांगितलेले नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. सभेतील गर्दीकडे बोट करीत आमच्या सभेला जनतेची गर्दी असते, तर घटनाबाह्य गद्दार मुख्यमंत्र्यांच्या सभेला ती खुर्च्यांची असते...असा खोचक टोलाही आदित्य ठाकरेंनी यावेळी लगावला आहे.

# या निष्ठावंतांचं करायचं काय?



**भाष्य** (भाग - 1)

नितीन सावंत
91 9892514124

**शिवसेनेने सध्या राज्यभर निष्ठावंत मिळावे घेण्यास सुरुवात केली आहे. युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे हे स्वतः उपस्थित राहून या निष्ठावंत मेळाव्यांना मार्गदर्शन करत आहेत. शिवसेनेत मोठी फूट पाडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेला मोठे आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे फक्त भाजपसोबत सत्ता स्थापन न करता थेट शिवसेना या पक्षावरच आपला हक्क सांगितला आहे. त्यामुळे सध्या ठाकरे कुटुंबीय आणि त्यांचे विश्वासू साथीदार हे फारच अस्वस्थ आहेत.**



एका बाजूला निवडणूक आयोगात मूळ पक्ष आपल्या ताब्यात राहावा यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे निष्ठावंत सहकारी अनिल देसाई, अनिल परब हे निवडणूक आयोगात भक्कमपणे बाजू लढवत आहेत. संघटना पूर्णपणे उद्धव ठाकरे यांच्यासोबत असली तरी कागदोपत्री मात्र शिंदे सेना उजवी ठरली आहे. त्याचबरोबर निवडणूक आयोग हे स्पष्टपणे सत्ताधारी भाजपची बाजू घेत असल्याचे त्यांच्या निर्णयावरून लक्षात येत आहे. त्याचमुळे आपली निशाणी धनुष्यबाण ही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला गेल्यास बरीच पंचाईत होईल, याची भीती उद्धव ठाकरे यांना आहे. कागदपत्रांच्या बाबतीत आणि वकिलांच्या युक्तीवादाबाबत उद्धव ठाकरे यांची शिवसेना कुठेही कमी पडलेली नाही. परंतु यापूर्वीचा निवडणूक आयोगाचा धनुष्यबाण ही निशाणी फ्रिज करण्याचा निर्णय पाहता निवडणूक आयोगात आपल्याला न्याय मिळणार नाही याची चिंता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला आहे.

शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या आमदारांचे मतदार संघ टारगेट केलेले आहेत. या मतदारसंघात जाऊन ते निष्ठावंतांना पक्षासोबत राहण्याची हाक देत आहेत. यापूर्वी आदित्य यांनी मराठवाड्यात जाऊन निष्ठावंतांना हाक दिली होती. मराठवाड्यात मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे यांचे लाडके सहकारी आणि कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्या मतदार संघात आदित्य यांना चांगला प्रतिसाद मिळाला. त्याचबरोबर मराठवाड्यातील इतर भागातही शिवसेना संघटना अजून मजबूत आहे हे पाहून ठाकरे कुटुंबीय सुखावले आहेत.

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना आणि आदित्य ठाकरे मंत्री असताना निष्ठावंतांना किंमत नव्हती. मात्र एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यामुळे अचानक निष्ठावंतांचा भाव वधारला आहे. ठाकरे सरकार पडण्यापूर्वी राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुका झाल्या. या निवडणुकीत निष्ठावंतांना किंमत नव्हती. सुभाष देसाई आणि दिवाकर रावते या जुन्याजाणत्या निष्ठावंतांना डावलून सचिन अहिर यांना विधान परिषदेचे तिकीट देण्यात आले. ते निवडूनही आले. केवळ एका वरळी मतदारसंघासाठी माजी आमदार सुनील शिंदे आणि सचिन अहिर या दोघांना विधान परिषदेवर संधी देण्यात आली. 2014 च्या निवडणुकीत सुनील शिंदे यांनी राष्ट्रवादीचे तत्कालीन उमेदवार सचिन अहिर यांचा पराभव केला होता. 2019 च्या निवडणुकीत सुनील शिंदे यांचे तिकीट कापून आदित्य ठाकरे वरळी मधून निवडून आले. सुनील शिंदे या निष्ठावंत शिवसैनिकाला संधी देण्याबाबत शिवसैनिकांची काहीही हरकत नव्हती परंतु यावेळी सचिन अहिर या आयाराम व्यक्तीला विधानपरिषद उमेदवारी देण्याचे कारण काय? असा प्रश्न वरळी नव्हे तर समस्त मुंबई शहरातील निष्ठावंत शिवसैनिकांना पडला आहे. यापूर्वी भाजपमधून दाखल झालेल्या मनीषा कायंदे यांना विधान परिषदेत संधी देण्यात आली. त्यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेना पक्षातील एकाही महिलेला संधी द्यावीशी वाटली नाही. सचिन अहिर यांना पदांची खिरापत वाढण्यात आली आहे. भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस पद आणि पुणे जिल्ह्यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याची संपर्क नेते पदाची जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे. एकही शिवसेनेचा निष्ठावंत नेता या पदासाठी उद्धव ठाकरेंना योग्य वाटला नाही. त्यामुळेच आता निष्ठावंतांना नव्याने हाक देण्याची गरज उद्धव ठाकरे यांना वाटली आहे.शिवसेनाप्रमुख कै. बाळासाहेब ठाकरे आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यामध्ये हाच फरक आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे कोणत्याही उमेदवारीसाठी संघटनेच्या माणसाला प्राधान्य देत असत. त्यांच्याकडे इलेक्टिव मेरीट हा प्रकार नव्हता. विधानसभेसाठी जिल्हाप्रमुख आणि नगरसेवक पदासाठी शाखाप्रमुख एवढेच शिवसेनाप्रमुखांचे गणित होते. मात्र उद्धव ठाकरे यांनी पक्ष ताब्यात घेतल्या नंतर इलेक्टिव्ह मेरीट ला महत्त्व आले आहे. शिवसेनाप्रमुखांनी याकडे फारसे लक्ष दिले नव्हते निष्ठावंताना त्यांच्या दरबारात किंमत होती. छगन भुजबळ आणि नारायण राणे यांनी शिवसेना फोडण्याचा प्रयत्न केला तेव्हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना निष्ठावंतांचे मेळावे घेण्याची गरज पडली नाही. पदे देताना इलेक्टिव्ह मेरिट आणि आर्थिक स्थिती हा निकष लावला की अशी परिस्थिती ओढवते.

(भाग - 2 उद्याच्या अंकात)

---

## भाष्य : शिक्षण व्यवस्थेतील 'अछूत कन्या'

***मानवी हक्कांबाबत व्यासपीठावर चर्चा होते, आदेश निघतात, कार्यक्रमही होतात. तथापि, मानवी हक्कांचा आदर करून त्यांचे पालन करण्याबाबत उदासीनता आढळते. शिक्षणक्रमात त्याबाबतच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यासाठी पावलेही उचलली गेली. मात्र शिक्षणासह अनेक क्षेत्रामध्ये हक्कांची पायमल्ली होताना दिसते.***

मानवी अधिकारांचा जागतिक जाहीरनामा दिवस १० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. पण मानवी अधिकारांच्या उल्लंघनाच्या आणि अवमुल्यनाच्या घटनांचा आलेख मात्र कमी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अगदी संयुक्त राष्ट्रांच्या मानवी अधिकार आयोगाने देखील अशा घटनांच्या नोंदी घेण्यापलीकडे ठोस असे कार्य केलेले नाही. कारण जागतिक राजकारणात मानवी हक्कांचे उल्लंघन होत असेल तर त्याबाबत हाळी देण्याचा मक्ता हा अमेरिका आणि अमेरिका-अंकित युरोपातील काही देशांनाच असल्याने इतर देश आणि काही संघटना यांच्या भूमिका आपसूकच अर्थहीन होताना दिसत आहेत.

---

## सरकारला लेखकांचा एवढा दुस्वास का?

**सध्या महाराष्ट्रात सरकारने जणू ते लेखक, अभ्यासक, संशोधक, विचारवंत यांना कसे कस्पटासमान समजते आणि त्यांचा कसा ठरवून अवमान करू शकते हे दाखवून देण्याचा सपाटाच लावलेला आहे.**

कोणत्याही सरकारने यापूर्वी केला नसेल एवढा अधिक्षेप हे सरकार करून दाखवते आहे. उदाहरण आहे लेखकांच्या बाबतीत होणाऱ्या भेदभावाचे. सरकार, मुख्यमंत्री, संबंधित सचिव, मराठी भाषामंत्री या साऱ्यांच्या हा भेदभाव तीनतीनदा लक्षात आणून देऊनही तो केला जातो आहे. सरकारने नुकताच एक फतवा काढला आहे. निवडक व बहुतेक फक्त लेखकच ज्या समित्यांमध्ये असतात अशाच समित्यांच्या, मंडळांच्या सदस्यांना निवडून त्यांची पुस्तके त्यांनी राज्य पुरस्कारांसाठी न पाठवण्याचा. पाठवल्यास ती बाजूला काढून ठेवली जातील असे त्यात म्हटले आहे. संबंधित फतवा गेल्याच वर्षी काढल्याचे सरकारच्या वतीने फक्त साहित्य आणि संस्कृती मंडळ अध्यक्षच तेवढे म्हणत आहेत. पण ते ना शासन आहेत ना प्रशासन, ना ते संबंधित मंत्री ना शासनाचे सचिव. तरीही तेच शासनाचे स्वयंघोषित प्रवक्ते म्हणून का बोलताहेत हे कळायला मार्ग नाही. ते शासनाचे नव्हे, तर लेखकांचे प्रतिनिधी आहेत. कारण ते मुळात लेखक,



संशोधक असल्यानेच विशिष्ट अवधीसाठी साहित्य आणि संस्कृती मंडळावर अध्यक्ष म्हणून नेमले गेले आहेत. त्यातही आपण प्रभारी आहोत असे त्यांचे म्हणणे आहे.

आमचे परम आदरणीय ज्येष्ठतम लेखक स्नेही मधु मंगेश कर्णिक. ते लेखकस्नेही असण्यापेक्षा शासनस्नेहीच. ते पूर्वी त्याच मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांनी तर ते ज्या मंडळाचे अध्यक्ष होते ते मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था या दोन्ही आस्थापना बंद करून तिसरीच संस्था निर्माण करण्यासाठी जो प्रशासकीय घाट तेव्हा घातला गेला होता त्याचे शासनकृत समर्थनच केले होते. विद्यमान अध्यक्ष, एका इंग्रजी म्हणीप्रमाणे, त्यांच्या जोडयात पाय घालून चालू बघताहेत. शासनाचे संबंधित मंत्री, सचिव कोणीच एक शब्दही बोलत नाहीत. त्यांनाही आम्ही आमच्या वतीने शासनाशी बोला, शासनाच्या वतीने आमच्याशी बोलू नका, ते काम शासनाचे शासनाला करू द्या, स्वतःला शासन समजू नका हेच म्हटले होते. विद्यमान अध्यक्षांनाही आमचे हेच म्हणणे आहे.

'मराठी भाषा विभागाच्या अधीनस्थ असलेल्या भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था या संस्थांवरील शासननियुक्त सदस्यांना, तसेच मराठी भाषा विभाग व अधीनस्थ चारही संस्थांमधील अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांची पुस्तके, तसेच मराठी भाषा विभाग व अधीनस्थ चारही संस्थांकडून प्रकाशित केली जाणारी पुस्तके यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी सादर करता येणार नाहीत. तसे निदर्शनास आल्यास ते पुस्तक सदर राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल.'

---

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाराष्ट्र हे भारताचं विकासइंजिन!

## सेवा, उद्योग आणि कृषी क्षेत्रात मोठ्याप्रमाणावर विकास करणार : देवेंद्र फडणवीस

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**"महाराष्ट्र हे भारताचं ग्रोथ इंजिन आहे. देशाच्या जीडीपीच्या १५ टक्के जीडीपी आपण महाराष्ट्रातून देतो. २० टक्क्यांपेक्षा जास्त निर्यात महाराष्ट्रातून होते. सगळ्याच सेक्टरमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. देशातील जवळपास ३८ टक्के एफडीआय हा महाराष्ट्रात येतो. अतिशय प्रगतिशील राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहीलं जातं. असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.**





यावेळी फडणवीस म्हणाले, "पुढील काळात ज्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं व्हिजन देशाला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेत परिवर्तित करण्याचं आहे. देशाची अर्थव्यवस्था ही ५ ट्रिलियन डॉलरची करायीच असेल, तर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही आपल्याला १ ट्रिलियन डॉलरची करावी लागेल. त्याच दृष्टिने आमचं सरकार हे अर्थव्यवस्थेच्या तिन्ही क्षेत्रांमध्ये सेवा, उद्योग किंवा कृषी क्षेत्र असो या तिन्ही क्षेत्रात मोठ्याप्रमाणात गुंतवणूक, सुधारणा, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा यांच्या आधारावर एक वेगवान अशा प्रकारची विकास करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.

"याशिवाय, "आगामी काळात नागपूर ते गोवा हा महामार्ग आपण तयार करणार आहोत. या महामार्गामुळे मराठवाड्यातील पाच जिल्हे हे इकोनॉमिक कॉरिडोरचा भाग होतील. त्याठिकाणच्या उद्योग व शेती क्षेत्राला खूप मोठी चालना आपण देऊ शकणार आहोत. एवढच नाहीतर समृद्धी महामार्ग आता आपण गडचिरोलीपर्यंत नेणार आहोत. गडचिरोलीमध्यते २० ते २५ हजार कोटींची गुंतवणूक येत आहे. नेक्स्ट स्टील हब ऑफ इंडिया हे गडचिरोली होणार आहे."असंही फडणवीसांनी सांगितलं.

### समृद्धी महामार्ग आता गडचिरोलीपर्यंत नेणार

**नागपूर ते गोवा हा महामार्ग आपण तयार करणार आहोत. या महामार्गामुळे मराठवाड्यातील पाच जिल्हे हे इकोनॉमिक कॉरिडोरचा भाग होतील. त्याठिकाणच्या उद्योग व शेती क्षेत्राला खूप मोठी चालना आपण देऊ शकणार आहोत. एवढच नाहीतर समृद्धी महामार्ग आता आपण गडचिरोलीपर्यंत नेणार आहोत. गडचिरोलीमध्यते २० ते २५ हजार कोटींची गुंतवणूक येत आहे. नेक्स्ट स्टील हब ऑफ इंडिया हे गडचिरोली होणार आहे."असंही फडणवीसांनी सांगितलं.**

---

# जुन्या निवृत्ती वेतन योजनेसाठी संपाची हाक

## राजपत्रित अधिकारी महासंघाचा 14 मार्चपासून आंदोलनाचा इशारा

।मुंबई। महाईन्यूज।

**राज्यातील सरकारी अधिकारी – कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी, या मागणीसाठी राजपत्रित अधिकारी महासंघ आक्रमक झाला असून महासंघाने त्यासाठी येत्या 14 मार्चपासून बेमुदत राज्यव्यापी संपाची हाक दिली आहे. नव्या पेन्शन योजनेमुळे राज्यसेवेतील नवनियुक्त अधिकारी-कर्मचारी आणि शिक्षकवर्ग भवितव्याच्याहृष्टीने चिंतीत आहेत. त्यामुळे सेवा उपदान तसेच कुटुंब निवृत्तीवेतन या महत्त्वाच्या बाबींचा अभाव असलेली नवीन पेन्शन योजना तातडीने रद्द करून जुनी पेन्शन योजना सुरुवातीपासून लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने केली आहे.**

राज्य सरकारने 1 नोव्हेंबर, 2005पासून राज्यसेवेत आलेल्या अधिकारी – कर्मचाऱ्यांना नवी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. मात्र, नवीन पेन्शन योजनेची सदोष अंमलबजावणी, तसेच गुंतवणूक-परतावा या बाबतीतील अविश्वासार्हता, यामुळे नवनियुक्त अधिकारी – कर्मचारी आणि शिक्षक आपल्या भवितव्याच्या दृष्टीने चिंतीत आहेत.

गोवा राज्य सरकारने जुन्या पेन्शन योजनेचा पर्याय खुला ठेवला असून, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू यासारख्या राज्यांनी तर नवीन पेन्शन योजनेचा स्वीकारच केला नाही, याकडे लक्ष वेधत राज्य शासकीय सेवेतील मोठ्या संख्येने कार्यरत अधिकारी – कर्मचाऱ्यांनी भविष्यातील आर्थिक अनिश्चितता दूर करण्यासाठी, राजस्थान, छत्तीसगढ, पंजाब, झारखंड आणि हिमाचल प्रदेशच्या धर्तीवर पुरोगामी महाराष्ट्र सरकारनेही जुनी पेन्शन योजना तातडीने लागू करावी, अशी मागणी महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दी. कुलथे यांनी केली आहे. जुनी पेन्शन लागू करण्यासाठी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने 14 मार्च, 2023पासून बेमुदत राज्यव्यापी संपाची घोषणा केली आहे.

औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि पुरोगामी विचारांचा वारसा असलेल्या महाराष्ट्र राज्यात देखील जुनी पेन्शन योजना लागू करणे शक्य आहे. परंतु त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. अधिकारी महासंघाचीही हीच भूमिका असून, आंदोलनाबाबतचा अंतिम निर्णय अधिकारी महासंघाच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत या महिनाअखेरीपर्यंत निश्चितपणे घेतला जाणार आहे, असेही कुलथे यांनी स्पष्ट केले.



### राज्यव्यापी संपाची घोषणा

जुनी पेन्शन लागू करण्यासाठी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने 14 मार्च, 2023पासून बेमुदत राज्यव्यापी संपाची घोषणा केली आहे.

---

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

## सातव्या वेतन आयोगानुसार मिळणार पगारवाढ



। मुंबई ।महाईन्यूज।

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटी दुर करण्यात आल्या आहेत. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना आता सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन देण्यात येणार आहे.

आजच महासंघाने परिपत्रक काढत आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र राज्य सरकारने शासन निर्णय काढला आहे. यामध्ये केंद्र सरकारच्या धरतीवर राज्यातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत.

राज्य सरकारच्या सेवेतील १०४ संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत. या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मिळणार आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ही मोठी खुशखबर आहे. वेतन श्रेणीतील तफावतीनंतर एक समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार शिफारशी वित्त आयोगाने स्विकारल्या आहेत. त्यामुळे १०४ संवर्गातील कर्मचाऱ्यांचा वाढीव वेतनाचा लाभ मिळणार आहे.

केंद्र सरकारने २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू केला. त्यानंतर राज्यात देखील हा आयोग दाखल करण्यात आला होता. मात्र त्यात त्रुटी होत्या, त्या त्रुटी शासन निर्णयामध्ये दुर करण्यात आल्या आहेत.

## दिल्ली, महाराष्ट्रानंतर आता तामिळनाडूमध्येही

# सरकार-राज्यपाल वाद!

### आरएन रवी यांच्या दलितांवरील विधानामुळे राजकारण तापण्याची शक्यता

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**तामिळनाडूचे राज्यपाल आरएन रवी यांनी डीएमके सरकारवर हल्लाबोल केला आहे. तामिळनाडूमध्ये दलितांवरील अत्याचारात वाढ होत असल्याचा दावा त्यांनी केला. राज्यात ‘सामाजिक न्याय’ कायम ठेवण्याच्या डीएमके सरकारच्या दाव्याची खिल्लीही त्यांनी उडवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वापर केवळ राजकारणासाठी केला जात आहे, असंही राज्यपाल म्हणाले.**



“इथे तामिळनाडूत आपण सामाजिक न्यायाबद्दल खूप बोलतो. पण प्रत्येक दिवशी येथे आपल्याला दलितांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल ऐकायला मिळतं. इथे दलित वसाहतीतील पिण्याच्या पाण्याच्या टाकीत मानवी विष्ठा टाकणं, सार्वजनिकपणे त्यांचा अपमान करणं, मंदिरात प्रवेश नाकारणं किंवा अंगणवाडी शाळा वेगळ्या करणं, असे अनेक प्रकार घडतात,” असा दावा राज्यपाल रवी यांनी केला.राज्यपाल रवी पुढे म्हणाले की, दलितांवर होणाऱ्या गुन्ह्यांबाबत कायद्याची अंमलबजावणी कुचकामी आहे. न्याय व्यवस्थेचा प्रतिसादही मंद आहे. “तामिळनाडूमध्ये दलित महिलांवर झालेल्या बलात्काराच्या घटनांमध्ये केवळ ७ टक्के आरोपी दोषी आढळतात. याचा अर्थ १०० पैकी ९३ बलात्कारी निर्दोष मुक्त होतात. अशी स्थिती असताना आपण सामाजिक न्यायाबद्दल बोलत असतो,” असा टोला राज्यपाल रवी यांनी लगावला.

#### 100 पैकी 93 बलात्कारी निर्दोष मुक्त होतात

**» दलितांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल ऐकायला मिळतं. इथे दलित वसाहतीतील पिण्याच्या पाण्याच्या टाकीत मानवी विष्ठा टाकणं, सार्वजनिकपणे त्यांचा अपमान करणं, मंदिरात प्रवेश नाकारणं किंवा अंगणवाडी शाळा वेगळ्या करणं, असे अनेक प्रकार घडतात,” असा दावा राज्यपाल रवी यांनी केला.राज्यपाल रवी पुढे म्हणाले की, दलितांवर होणाऱ्या गुन्ह्यांबाबत कायद्याची अंमलबजावणी कुचकामी आहे. न्याय व्यवस्थेचा प्रतिसादही मंद आहे. “तामिळनाडूमध्ये दलित महिलांवर झालेल्या बलात्काराच्या घटनांमध्ये केवळ ७ टक्के आरोपी दोषी आढळतात. याचा अर्थ १०० पैकी ९३ बलात्कारी निर्दोष मुक्त होतात. अशी स्थिती असताना आपण सामाजिक न्यायाबद्दल बोलत असतो,” असा टोला राज्यपाल रवी यांनी लगावला.**

“दलितांसाठी घरे बांधण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या निधीपैकी ३० टक्के निधी खर्च केला जात नाही. तर उर्वरित निधी इतर कारणांसाठी वळवला जातो, असं सीएएफ अहवालातून समोर आलं आहे. पण नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून खूप गोष्टी बदलल्या आहेत,” असेही ते म्हणाले.

---

## देशातील उद्योगांनी संरक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी

### 14 व्या एरो इंडिया या कार्यक्रमाचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते पार

।|नवी दिल्ली। महाईन्यूज ।

देशातील खासगी उद्योगांनी संरक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची गरज आहे. या अमृतकाळात देशात संरक्षण क्षेत्राचे महत्त्व वाढले असून या क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत. या संधीचा फायदा उद्योगांना घेता येईल. असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले.

भारतीय हवाईदलातर्फे कर्नाटकातील येलंका येथे आयोजित १४ व्या एरो इंडिया या कार्यक्रमाचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते पार पडले.

या प्रसंगी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री अजय भट, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंदिया, कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, कर्नाटकची मुख्य सचिव वंदिता शर्मा, सैन्यदल प्रमुख जनरल मनोज पांडे, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल विवेक चौधरी, नौदल प्रमुख अडमिरल हरी कुमार आदी उपस्थित होते.मोदी म्हणाले, "ज्या देशात मागणी, अनुभव आणि क्षमता अधिक असते, त्या देशात उद्योग वाढतो. अशी स्थिती आता भारतात निर्माण होत आहे. त्यामुळे उद्योगांनी संरक्षण क्षेत्रात सहभाग वाढवावा. स्वदेशी व नावीन्यपुर्ण तंत्रज्ञान विकसित करून आधुनिक उत्पादने तयार करत भारताने जगभरात आपली नवी ओळख निर्माण केली आहे. तेजस सारखे स्वदेशी विमान व आयएनएस विक्रांत हे त्याचेच उदाहरण आहे. केवळ निर्मितीच नाही तर आपल्या उत्पादनांची क्षमता पाहता, मित्र देशांचा या उत्पादनांच्या प्रति विश्वास वाढत आहे. परिणामी परदेशातील उद्योग आणि भारतातील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात सामंजस्य करार होत आहेत."



#### संरक्षण क्षेत्राचे सामर्थ्य दर्शविणारा कार्यक्रम

**» या कार्यक्रमाच्या माध्यमातून बंगळूरचे आकाश हे नव्या भारताच्या सामर्थ्याचे साक्षीदार ठरत आहे. देशाचे संरक्षण क्षेत्र आत्मनिर्भर भारतच्या दिशेने काम करत असून त्या कामाची पावती आपल्याला या पाच दिवसांच्या कार्यक्रमातून दिसून येईल.**
**तसेच या माध्यमातून लष्करी विमाने, हेलिकॉप्टर, उपकरणे आणि नवीन युगातील एव्हीओनिक्सच्या निर्मितीसाठी उदयोन्मुख केंद्र म्हणून भारताची प्रतिमा समोर येईल.**
**एरो इंडिया हा फक्त विमानांची कवायती सादर करणारा कार्यक्रम राहिला नसून भारताचा आत्मविश्वास आणि क्षमतांचे प्रतिबिंब आहे. २१ व्या शतकातील हा नवा भारत येणारी कोणतीही संधी सोडणार नाही. असे मोदींनी नमूद केले.**

## सत्तासंघर्षाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

### 7 न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे प्रकरण वर्ग होईल का?

।मुंबई। महाईन्यूज ।

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाची सुनावणी उद्या (14 फेब्रुवारी) होणार आहे. बोर्डावर पहिल्या क्रमांकाचे प्रकरण असेल, असेही सर्वोच्च न्यायालयाने गेल्या सुनावणीच्या वेळी स्पष्ट केले आहे. गेल्या महिन्यात 10 तारखेला सुनावणी झाली होती. हे प्रकरण 7 न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे प्रकरण वर्ग करण्याची मागणी ठाकरे गटाने केली आहे. त्याबाबतही उद्या सुनावणी होणार आहे.

गेल्या 7 महिन्यांपासून राज्यात सत्तासंघर्ष सुरू आहे आहे. महाराष्ट्रात भाजपाच्या मदतीने एकनाथ शिंदेंनी बंड केले आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर त्यांनी केलेली नव्या सरकारची स्थापना, 16 आमदारांच्या अपात्रतेची याचिका (ठाकरे गटाकडून), विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव (शिंदे गटाकडून) यासह आणखी



इतर याचिकांवर सर्वांत आधी 21 जुलै रोजी एकत्रित सुनावणी झाली होती. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन सरन्यायाधीश एन. व्ही. रमण, न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी शिवसेनेच्या बाजूने आणि ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी शिंदे गटाच्या बाजूने युक्तिवाद केला. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने परिस्थिती जैसे थे ठेवत ही सुनावणी 1 ऑगस्ट 2022 पर्यंत पुढे ढकलली होती. त्यानंतर तारीख पे तारीख मिळत आता ही सुनावणी नव्या वर्षातील 10 जानेवारी 2023ला झाली. सरन्यायाधीश वाय. एस. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठासमोर सुनावणी झाली असता ती 14 फेब्रुवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

तर, दुसरीकडे शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतचा प्रश्न निवडणूक आयोगाकडे प्रलंबित आहे. निवडणूक आयोगाकडे 30 जानेवारीत झालेल्या शेवटच्या सुनावणीत ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांना लेखी युक्तिवाद सादर केला आहे. शिवसेनेने दाखल केलेल्या 16 आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आधी निर्णय घ्यावा.

तोपर्यंत निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्हाबाबत निर्णय घेऊ नये, असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी केले आहे.विशेष म्हणजे, येत्या 26 फेब्रुवारी 2023 रोजी पुण्यातील कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक होत आहे. या दोन्ही ठिकाणी तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. कसबा पेठमध्ये काँग्रेसचे रवींद्र धंगेकर, भाजपचे हेमंत रासने आणि महासंघाचे आनंद दवे यांच्यात लढत होईल.

# ऑनस्क्रीन किसिंग सीन नको रे बाबा!

बॉलिवूड चित्रपटांमध्ये रोमान्स आणि किसिंग सीन नसेल असे क्वचितच पाहायला मिळते. बहुतेक नायक यश मिळविण्यासाठी त्यांच्या चित्रपटातील कहाणीच्या कथित मागणीवर किसिंग सीन्स करणे टाळत नाहीत.

कदाचित सलमान खान याला अपवाद ठरला आहे, जो आपल्या हिरोइन्सना किस करत नाही आणि त्याचे चित्रपट प्रचंड कमाई करतात. आता सलमान खान किसी का भाई किसी की जान' या चित्रपटातून त्याच्या चाहत्यांसमोर येणार आहे.

सलमान खानचा कोणताही चित्रपट आठवला तर तो नायिकेला मिठी मारतो पण किस करत नाही. पडद्यावर अशी एकही नायिका नाही जी म्हणेल की सलमान खानने तिला पडद्यावर किस केले आहे. तर दुसरीकडे शाहरुख खान, अजय देवगण आणि आमिर खान सारखे मोठे स्टार्स किस करायला अजिबात मागेपुढे पाहत नाहीत.

मात्र, सलमान खानने त्याचा पहिला आणि एकमेव लिपलॉक भाग्यश्रीसोबत सूरज बडजात्याच्या मैने प्यार किया या चित्रपटात केला होता. या सीनमध्ये सलमानने नायिकेला हातही लावला नाही.

अशा परिस्थितीत हा लिपलॉक कसा घडला याचीही एक कहाणी आहे. सूरज बडजात्या यांनी भाग्यश्री आणि सलमानचे मन वळवण्याचा खूप प्रयत्न केला. दोघेही या लिपलॉकसाठी अजिबात तयार नव्हते.

सूरज बडजात्याने काचेचा ग्लास दोघांमध्ये ठेवला आणि त्यामुळे हा सीन शूट करता आला. यानंतर सलमानने आजपर्यंत कुणालाही किस केले नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याचे 'नो किस क्लॉज'. चित्रपटात येण्याआधीच त्याने निर्णय घेतला होता की तो कधीही कोणत्याही नायिकेच्या ओठावर किस करणार नाही.

सलमानने आजपर्यंत स्वत:ला दिलेले हे वचन मोडले नाही. चित्रपटाची स्क्रिप्ट वाचल्यानंतर तो स्पष्ट करतो की चित्रपटात किसिंग सीन नसावा. यासोबतच सलमानचा असाही विश्वास आहे की त्याचे चित्रपट संपूर्ण कुटुंबाचे असतात. त्यामुळे अशी दृश्ये योग्य नाहीत.जब तक है जान' चित्रपटात शाहरुख खानने कतरिना कैफसाठी त्याचे नो किस क्लॉज तोडले होते. तर अजय देवगणने त्याच्या 'शिवाय' चित्रपटात नायिका एरिका फर्नांडिसला जवळपास एक मिनिट किस करून नो किस क्लॉज तोडला.

आमिर खानबद्दल बोलायचे झाले तर त्याच्यासाठी कोणत्याही किस क्लॉजने फरक पडत नाही. कथेच्या मागणीनुसार तो असे सीन्स करायला चुकत नाही.



# 'सातारचा सलमान' येतोय कल्ला करायला..

सुयोग गोऱ्हे, शिवानी सुर्वे, सायली संजीव, अक्षय टंकसाळे, मकरंद देशपांडे, आनंद इंगळे यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या 'सातारचा सलमान' या चित्रपटाचे नवीन पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर झळकले आहे. टेक्सास स्टुडिओज प्रस्तुत, प्रकाश सिंघी निर्मित हा चित्रपट रिलायन्स एंटरटेनमेंटतर्फे प्रदर्शित होणार आहे.

'स्पप्नं बघितली तरंच खरी होतात' अशी टॅगलाईन असलेल्या या पोस्टरमध्ये सगळे कलाकार एका हूक स्टेपमध्ये दिसत आहेत. साताऱ्यामध्ये राहणाऱ्या एक सामान्य मुलाची ही कथा आहे, जो हिरो बनायचे स्वप्न बघतोय. त्याचे हे स्वप्न पुर्ण होते का, याचे उत्तर लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहे. सातारचा सलमानची घोषणा ४ वर्षांपूर्वी म्हणजेच २०१९ ला झालेली. इतकंच नव्हे २०१९ च्या गणेशोत्सवात सातारचा




सलमान सिनेमाचं प्रमोशन करण्यात आलेलं. पण नंतर मात्र हा सिनेमा रखडला. गेली अनेक वर्ष सिनेमाबद्दल कोणतीही चर्चा झाली नव्हती. परंतु आज अचानक सिनेमाचं पोस्टर रिलीज झाल्याने सर्वांच्या मनात आनंद आणि उत्सुकता निर्माण झाली आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित 'सातारचा सलमान' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख निश्चित झाली असून येत्या ३ मार्च रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेसातारचा एक मुलगा हिरो बनण्याचं स्वप्न पाहतो आणि तो त्याच स्वप्न सत्यात उतरवतो का अशी कथा सिनेमात पाहायला मिळणार आहे. पिंपरखेडचा लेखक - दिग्दर्शक हेमंत ढोमेने सिनेमाच्या लेखन - दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. त्यामुळे झिम्मा नंतर हेमंत ढोमेचा हा नवा सिनेमा थिएटर मध्ये फुल्ल टू करणार करणार यात शंका नाही. त्यामुळे आता सर्वांना ३ मार्च २०२३ ला सातारचा सलमान सिनेमा पाहण्याची उत्सुकता लागली आहे..

# सिड-कियाराच्या रिसेप्शनमधील बोल्ड लूकमुळे दिशा झाली ट्रोल

सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी यांच्या लग्नाचे रिसेप्शन रविवारी रात्री मुंबईत पार पडले. रिसेप्शनला अनेक सिनेतारकांनी हजेरी लावली होती.

यामध्ये चित्रपट अभिनेत्री दिशा पटनी देखील पोहोचली होती, परंतु सोशल मीडिया वापरकर्त्यांनी दिशाला ट्रोल केले. तिच्या ड्रेसिंग सेन्सवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

दिशा लग्नाच्या रिसेप्शनमध्ये अतिशय बोल्ड लूकमध्ये पोहोचली होती. चमकदार हिरव्या रंगाच्या ड्रेसमध्ये दिशा तिथे पोहोचली तेव्हा सगळ्यांच्या नजरा तिच्यावर खिळल्या.

दिशाने तिथल्या पापाराझींसाठी पोजही दिली. दिशा एकटीच रिसेप्शनवर पोहोचली. मात्र, काही लोकांना तिची बोल्ड स्टाइल फारशी आवडली नाही आणि त्यांनी अभिनेत्रीला ट्रोल करायला सुरुवात केली.पापाराझी वरिंदर चावलाने दिशाचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओवर अनेक यूजर्सनी दिशाला कमेंट केले आहे. एकाने लिहिले की, "हे बॉलीवूडचे आयटम साँग नाही, हे कोणाच्यातरी लग्नाचे रिसेप्शन आहे."एकाने दिशाला ट्रोल केले आणि लिहिले की, "तिला कपड्यांची ऍलर्जी आहे. मला वाटते की तिला कार्यक्रमांमध्ये चांगले कपडे कसे घालायचे हे देखील माहित नाही." तसेच आणखी एका यूजरने कमेंट केली, "ती पार्टीत सहभागी न होता आयटम सॉंगसाठी आली आहे



# रश्मी देसाईची लव्ह लाईफ कायमच चर्चेत



छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध अभिनेत्री रश्मी देसाईचा आज 13 फेब्रुवारी रोजी 37 वा वाढदिवस आहे. रश्मी कामापेक्षा तिच्या लव्ह लाईफमुळे अधिक चर्चेत आली. 1986 मध्ये आजच्या दिवशी नागाव येथे तिचा जन्म झाला.

ती आसामची आहे आणि तिने लहान वयातच अभिनय क्षेत्रात करिअरला सुरुवात केली होती. अभिनेत्रीने वयाच्या 16-17 व्या वर्षी अभिनयाच्या जगात प्रवेश केला. रश्मी देसाईने 2006 मध्ये 'रावण' या मालिकेतून तिच्या करिअरची सुरुवात केली होती. पण त्याआधी तिने भोजपुरी आणि आसामी चित्रपटात अभिनयाचा पराक्रम दाखवला होता. तिने भोजपुरीमध्ये मनोज तिवारीसारख्या स्टार्ससोबत रोमान्स केला आहे.

चित्रपटांसोबतच ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही खूप चर्चेत असते. पतीपासून विभक्त झाल्यानंतर तिने एक नाही तर 3-3 जणांशी संबंध ठेवले आहेत. पण आजही तिने लग्न केलेले नाही.'उतरन' या टीव्ही मालिकेतून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री रश्मी देसाई हिने 2012 मध्ये नंदिश संधूसोबत लग्न केले. दोघे 'उत्रान'च्या सेटवर भेटले आणि सेटवर काम करत असताना जवळ आले. यानंतर 2012 मध्ये त्यांचे लग्न झाले. मात्र, त्यांचे नाते फार काळ टिकू शकले नाही. नंदिश आणि रश्मीचे नाते चार वर्षांतच तुटले. रिपोर्ट्सनुसार, यानंतर अभिनेत्रीचे नाव लक्ष्य लालवानीसोबत जोडले गेले. लक्ष्य रश्मीपेक्षा 10 वर्षांनी लहान असल्याचं सांगण्यात येत आहे. अभिनेत्रीची आई या नात्यावर खूश नव्हती, ज्यामुळे ते वेगळे झाले.

# मुंबईच्या जेमिमासाठी यूपी-दिल्लीचा सामना!

## » 'इतक्या' कोटींच्या बोलीवर दिल्लीने मारली बाजी

। मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महिला प्रीमियर लीगच्या लिलावात मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्सला आपल्या संघात घेण्यासाठी दिल्ली आणि यूपी संघांच्या मालकांमध्ये चुरस पाहायला मिळाली.**




महिला प्रीमियर लीग या स्पर्धेसाठी सध्या मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकूल येथे खेळाडूंचा लिलाव सुरू आहे. या लिलावात तब्बल ४४८ महिला खेळाडू पात्र ठरले आहेत. मुंबई, दिल्ली, गुजरात, लखनौ आणि बंगळुरू असे पाच संघ महिला प्रीमियर लीगच्या पहिल्या पर्वात सहभागी होणार आहेत. हे संघ खेळाडूंच्या लिलावात सहभागी झाले आहेत. या लिलावात आतापर्यंत भारताची स्टार क्रिकेटपटू स्मृती मंधाना, ॲश्ले गार्डनर आणि नॅट शिवर यांच्यावर सर्वाधिक बोली लागली आहे. स्मृती मंधानासाठी बँगलोरने ३.४० कोटी रुपये मोजले, तर ॲश्ले गार्डनरसाठी गुजरातने सर्वात मोठी ३.२० कोटी रुपयांची बोली लावली. त्यापाठोपाठ नॅट शिवरसाठी मुंबईने ३.२० कोटी रुपयांची बोली लावली.

मुंबई इंडियन्सने भारताची कर्णधार हमनप्रीतवर १.८० कोटी रुपयांची बोली लावत तिला आपल्या संघात सामील करून घेतलं. दरम्यान, मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्स हिच्यासाठी देखील सर्व फ्रेंचायझी उत्सूक दिसल्या. जेमिमाची बेस प्राईस ५० लाख रुपये इतकी होती. तिला आपल्या संघात घेण्यासाठी लखनौ आणि दिल्लीच्या संघात बोली युद्ध रंगलं होतं. अखेर हे बोली युद्ध दिल्ली कॅपिटल्सने जिंकलं. दिल्ली कॅपिटल्सने जेमिमावर २.२० कोटी रुपयांची बोली लावत तिला आपल्या संघात सहभागी करून घेतलं.

### कशी आहे जेमिमाची आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकीर्द?

**»२२ वर्षीय जेमिमा ही तिच्या आक्रमक फटकेबाजी आणि चपळ क्षेत्ररक्षणासाठी प्रसिद्ध आहे. जेमिमाने आतापर्यंत २१ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. यात तिने ३ अर्धशतकांसह ३९४ धावा जमवल्या आहेत. तर टी-२० क्रिकेटमध्ये तिने आपलं नाणं खणखणीत वाजवलं आहे. ७६ टी-२० सामन्यांच्या ६६ डावांमध्ये तिने १० अर्धशतकांसह १,६२८ धावा फटकावल्या आहेत.**

# गल्फ जायंट्स बनले पहिले आयएल टी-२० चॅम्पियन

## » फायनल सामन्यात डेझर्ट वायपर्सचा केला पराभव

।दुबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गल्फ जायंट्स यूएईच्या टी-२० फ्रेंचाइज लीग (ILT20) चा चॅम्पियन बनला आहे. अंतिम सामन्यात त्याने डेझर्ट वायपर्सचा पराभव करून आयएल टी-२० ची पहिली ट्रॉफी जिंकली. डेझर्ट वायपर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना ८ विकेट गमावत १४६ धावा केल्या होत्या, प्रत्युत्तरात गल्फ जायंट्स संघाने १९ व्या षटकातच लक्ष्य गाठले.

रविवारी (१२ फेब्रुवारी) रात्री दुबईत झालेल्या अंतिम सामन्यात गल्फ जायंट्सचा कर्णधार जेम्स विन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जेम्सचा हा निर्णय योग्य ठरला आणि गल्फ जायंट्सच्या गोलंदाजांनी ४४ धावांपर्यंत मजल मारताना डेझर्ट वायपर्सला ४ मोठे धक्के दिले.येथून सॅम बिलिंग्ज (३१) आणि वानिंदू हसरंगा (५५) यांच्या खेळीमुळे डेझर्ट वायपर्सला सन्मानजनक धावसंख्या गाठता आली. गल्फ जायंट्सचा गोलंदाज कार्लोस ब्रॅथवेटने ३ आणि कैस अहमदने २ विकेट घेतल्या. डी ग्रँडहोम आणि ख्रिस जॉर्डन यांनाही प्रत्येकी एक विकेट घेतली. त्याला गेरहार्ड इरास्मस (३०) आणि शिमरॉन हेटमायर (नाबाद २५) यांनी चांगली साथ दिली. अशाप्रकारे गल्फ जायंट्सने १८.४ षटकांत केवळ ३ विकेट्स गमावून सामना जिंकला. कार्लोस ब्रॅथवेटला त्याच्या दमदार गोलंदाजीसाठी 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून निवडण्यात आले.

### ख्रिस लिनने दमदार खेळी केली.

**» १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गल्फ जायंट्सला सुरुवातीलाच दोन धक्के बसले. कर्णधार जेम्स विन्स (१४) आणि अष्टपैलू कॉलिन डी ग्रँडहोम (१) एकूण २६ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतले. येथून ख्रिस लिनने ५० चेंडूत नाबाद ७२ धावा करत आपल्या संघाचा मोर्चा सांभाळला.**

**खेळाडूंनी केला जल्लोष –** आयएल टी-२०ची पहिली ट्रॉफी जिंकल्यानंतर गल्फ जायंट्सचे खेळाडू आनंद साजरा केला. संघातील सर्व खेळाडूंनी ट्रॉफीसोबत फोटो क्लिक केले. यादरम्यान स्टेडियममध्येही क्रिकेट चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता.




# क्लब विश्वचषक फुटबॉल स्पर्धा: रेयाल माद्रिदला आठव्यांदा जेतेपद

। मोरोक्को । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

विनिशियस ज्युनियर आणि फेडेरिको व्हॅल्व्हर्डे यांनी झळकावलेल्या दोन गोलच्या जोरावर रेयाल माद्रिदने क्लब विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सौदी अरेबियाच्या अल हिलाल क्लबवर ५-३ असा विजय मिळवला आणि विक्रमी आठव्यांदा स्पर्धेचे जेतेपद मिळवले.निर्णायक सामन्यात अपेक्षेनुसार माद्रिदने आक्रमक सुरुवात केली. विनिशियसने सामन्याच्या १३व्या मिनिटाला संघाला आघाडी मिळवून दिली. यानंतर काही मिनिटांतच फेडेरिकोने (१८व्या मि.) गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. अल हिलालकडून मोसा मारेगाने (२६व्या मि.) गोल झळकावत आघाडी २-१ अशी कमी केली. माद्रिदने मध्यांतरापर्यंत आपली आघाडी कायम राखली.दुसऱ्या सत्रात माद्रिदने आक्रमक खेळ करण्यास सुरुवात केली. तारांकित खेळाडू करिम बेन्झिमाने (५४ व्या मि.) प्रतिस्पर्धी संघाच्या बचावफळीला चकवत माद्रिदच्या खात्यात आणखी एका गोलची भर घातली. यानंतर फेडेरिकोने (५८व्या मि.) गोल करत संघाला ४-१ असे सुस्थितीत पोहोचवले. अल हिलालकडून लूसियानो वीटोने (६३व्या मि.) गोल करत संघाच्या खात्यात दुसऱ्या गोलचा भरणा केला.

